# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २२ जुलै, २०१५ / आषाढ ३१, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री | |
| (३) | पर्यावरण मंत्री | |
| (४) | पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४९**

---

**जळगांव जिल्हयातील प्रलंबित पेयजल योजनांच्या कामाबाबत**

**(१) * १९७५२ श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निंभोरा (ता.पाचोरा, जि.जळगांव) ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या नगरदेवळा येथे गत तीन महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून तेथील नागरिकांना अर्धा-एक कि.मी अंतरावरून पाणी आणावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिरसोली (जि.जळगांव) प्र.न. येथील मुख्य रस्त्यावरील पाईप लाईन फुटून हजारो लिटर पाण्याचा अपव्यय होत असतानाही ग्रामप्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मौजे कोंगानगर (ता.चाळीसगाव, जि.जळगांव) येथील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या योजनेचे काम गत ६ ते ७ वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील योजनेचे काम ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येत असून समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्या दुर्लक्षामुळे या योजनेचे काम प्रलंबित असून या योजनेची तातडीने चौकशी करण्यात यावी अशी मागणी सरपंच, वाघले ग्रामपंचायत, ता.चाळीसगाव, जि.जळगांव यांनी कार्यकारी अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांच्याकडे दिनांक २ मे, २०१५, रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली, तसेच उक्त भागातील पाण्याची टंचाई दूर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

परंतु, शिरसोली प्र.न. येथे मे २०१५ मध्ये गावातील वितरण व्यवस्थेतील ४ इंच पाईप लाईन फुटली होती. सदरील पाईपलाईन ही सिमेंटची असल्याने व जुनी झाली असल्याने फुटली होती. परंतु फुटलेल्या पाईप लाईनचे दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतीमार्फत दुरुस्त होऊन वितरण व्यवस्थेतील गळती बंद करण्यात आलेली आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

परंतु सदरील योजनेतील विहीर वाघले धरणात येत असल्याने व धरणात पाणी असल्याने सुरुवातीला २ वर्ष विहिरीचे काम न करता आल्यामुळे योजनेच्या कामास विलंब झाल्याने व दरसूचीत बदल झाल्याने सुधारित योजनेस दिनांक ४ जून, २०१४ अन्वये मान्यता देण्यात आल्यामुळे योजना प्रलंबित राहिली.

(५) उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, पाचोरा यांनी सदर कामाची पाहाणी करुन व प्रत्यक्ष भेट देवून दिनांक १९/१२/२०१४ व दिनांक १२/३/२०१५ रोजीच्या आढावा बैठकीत योजनेतील पाणीपुरवठा सुरु करणेबाबत अध्यक्ष/सचिव यांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच लेखी स्वरुपात उप अभियंता यांनी समितीस दिनांक १२/५/२०१५ व दिनांक ११/६/२०१५ अन्वये कळविले आहे. सदर गावास सद्यस्थितीत अस्तित्वातील विहिरीवरुन पाणी पुरवठा सुरु असून गावात सध्या पाणी टंचाई नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील रमजानपुरा परिसरात नवीन उर्दु माध्यमिक शाळा सुरु करण्याबाबत

**(२) * १९५७१ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील अब्दुल कादिर एज्युकेशनल ॲन्ड सोशल वेल्फेअर सोसायटी या संस्थेने रमजानपुरा परिसरात नवीन उर्दु माध्यमाची माध्यमिक शाळा सुरु करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव दाखल केला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयातील परिच्छेद १० मध्ये उर्दू माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना गरजेनुसार परवानगी देण्यात येईल असे नमुद करण्यात आलेले आहे व त्यासाठी बृहत आराखड्याची गरज नसल्याचे स्पष्ट करण्यात आलेले असतानाही उक्त शाळेच्या प्रस्तावास मान्यता न देण्याची कारणे काय आहेत,
(३) उक्त शाळेच्या प्रस्तावास त्वरीत मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) व (३) ग्रामीण भागामध्ये नवीन उर्दू माध्यमाच्या माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यासंदर्भात माध्यमिक शाळांची गरज असणारी ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार अशा ठिकाणी शाळेस परवानगी मिळण्याकरीता इच्छुक असलेल्या पात्र शैक्षणिक संस्थाकडून ऑनलाईन पध्दतीने

अर्ज मागविण्यात आले आहेत. त्याप्रमाणे शहरी भागाकरीता देखील उर्दू माध्यमाच्या माध्यमिक शाळांची गरज असणारी ठिकाणे निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सबब वैयक्तिक प्रस्तावावर विचार करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर विभागामध्ये राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेचे अनुदान थकीत असल्याबाबत**

**(३) * २११६१ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेचे रु.३०,७५,००० इतके अनुदान गेल्या ३ वर्षापासून शिक्षण संचालनालयाकडे थकीत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच नागपूर विभागामध्ये मागील ३ वर्षात ७८ विद्यार्थ्यांचे अपघाती मृत्यू झाले असतानाही शिक्षण संचालनालयाने उक्त योजनेचे अनुदान संबंधितांना दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील अनुदान न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदरील अनुदान संबंधितांना त्वरीत वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, साधारणत: केंव्हापर्यंत उक्त कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयातील शिरुर (ता.वैजापूर) व पीरबावडा (ता.फुलंब्री) येथील पाणीटंचाईबाबत**

**(४) * १७१७० श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील भटना धरणात गत दहा वर्षात अवाढव्य खर्च करुनही पाण्याचा थेंबही न साचल्याने ते निकामी ठरल्याने आता राष्ट्रीय पेयजल योजनेवर ४ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे यासाठी धरणाला

लागूनच दोन विहिरी खोदण्यात आल्या असून त्या विहिरीनांही पाणी नसल्यामुळे टँकरद्वारे विहिरीत, विहिरीतून पाईप लाईनद्वारे टाकीत व टाकीतून नळाद्वारे गावाला दर पंधरा दिवसाआड पाणी पुरविले जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पीरबावडा (ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद) या गावाला केवळ दोन टँकरद्वारे आलेले पाणी दुर्गंधीयुक्त विहिरीत सोडले असल्यामुळे गढूळ पाणी पिण्याची नागरीकांवर वेळ आली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील गावाला मन्यार धरणातून पाणी पुरवठा करण्याबाबत तसचे प्रश्न भाग (२) मधील विहिरींची साफसफाई करण्याबाबत व शुध्द पाण्याचे टँकर वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशतः खरे आहे.

शिवूर पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीत आहे. दोन्ही विहिरींचे खोलीकरण मे, २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले असून गावाला आवश्यक असणारे पाणी विहिरीव्दारे उपलब्ध झाले आहे. सन २०१५ उन्हाळ्यात तीव्र पाणी टंचाई असूनही एका विहिरीव्दारे २.५० लक्ष लिटर व उर्वरित ०.८० लक्ष लिटर पाणी टँकरव्दारे दि. १५.४.२०१५ पासून सुरु केले व दुस-या विहीरीचे खोलीकरण पूर्ण झाल्यानंतर दि. ९.६.२०१५ पासून टँकर बंद करण्यात आले. योजनेतून प्रायोगिक तत्वावर डिसेंबर, २०१४ पासून पाणी पुरवठा सुरु आहे. दोन्ही विहिरीव्दारे शिवूर गावाला शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

गावात असलेल्या विहिरींची पूर्णपणे साफसफाई करुनच विहिरीत टँकरचे पाणी सोडले जात होते. तसेच टँकरच्या पाण्यात नियमित ब्लिचींग पावडर टाकून गावास शुध्द पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच सदर पाण्याची प्रयोगशाळेमार्फत तपासणी करण्यात येऊन प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या दरम्यान पीरबावडा गावात कोणत्याही जलजन्य आजाराची साथ आढळून आलेली नाही. तसेच पाणी दुर्गंधीयुक्त असल्याची कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) भटणा धरणातील योजनेच्या दोन्ही विहिरींना पुरेसा पाणी साठा झाल्याने शिवूर गावाला शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा सुरु आहे. त्यामुळे मन्यार धरणातून पाणी पुरवठा सुरु करण्याची आवश्यकता नाही.

पीरबावडा गावात असलेल्या विहिरीची साफसफाई करुन टँकरच्या पाण्यात नियमित ब्लिचींग पावडर टाकून शुध्द पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. पीरबावडा गावास पुरेसा पर्जन्यमान झाल्यामुळे सदर गावाचे टँकर दि. १४ जून, २०१५ रोजी बंद करण्यात आले आहे व गावातील नळ योजनेचा पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबादमधील खाम नदीत घातक व विषारी रसायन सोडण्यात येत असल्याने नदी प्रदुषित झाल्याबाबत**

**(५) * १८०५९ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद परिसरातील खाम नदीच्या पात्रात विषारी आणि घातक रसायने टँकरद्वारे सोडून प्रदूषण केल्याची बाब दि. २८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाळुंज (जि.औरंगाबाद) एमआयडीसी परिसरातील स्टरलाईट कंपनीतील घातक व विषारी रसायन खाम नदीत सोडण्यात येत असताना वाळूंज पोलीसांनी दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास पकडले असून सदर विषारी रसायन स्टरलाईट कंपनी ठेकेदारामार्फत सन २०११ पासून खाम नदीत ११ कोटी रुपयांच्या ठेकेदारीने सोडत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत पोलीसांनी कंपनीच्या व्यवस्थापकावर व ठेकेदारावर चौकशी करुन गुन्हा नोंदविला आहे काय तसेच विषारी रसायन नदीपात्रात टाकून प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रकरणी गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त माहितीवरुन दि.२८/०२/१५ रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशन वाळुंज, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं. ४५/१५ भा.दं.वि.कलम २७७, २७८, २८४, ३०८, ३३६, ३४, १२०(ब), १०९, ११४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

(२) गुन्हयातील १० आरोपींनी संगनमत करुन, कट रचून स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी स्टरलाईट कंपनीतून हायड्रोक्लोरिक ॲसिड टँकरद्वारे कल्याण, मुंबई, वापी, गुजरात,निमराणी, खाबोने मध्यप्रदेश येथे पोहचविण्यासाठी एकूण रु.११,८५,६७३९४/- वाहतुकी पोटी घेवून कराराप्रमाणे न पोहचवता वाहतुकीचा खर्च वाचविण्यासाठी सदर ॲसीड खाम नदीच्या पाण्यात सोडून दिले.

(३) होय, दाखल गुन्हयातील १० पैकी ५ आरोपींना दि. २८/०२/२०१५ रोजी, १ आरोपीस दि. ०१/०३/२०१५ व १ आरोपीस दि.११/०५/१५ रोजी अटक करुन पोलीस व न्यायालयीन कोठडी घेऊन तपास करण्यात आला. पैकी ६ आरोपीविरुध्द दोषारोप दाखल करण्यात आले असून १ आरोपीविरुध्द दोषारोप दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच रसायनाने भरलेले ५ टँकर, १ अर्धा भरलेला व १ खाली असे ७ टँकर व पाईप असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उर्वरित आरोपींना अटक करण्यावर गुन्हयाचा तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**वाशिम जिल्हयातील गावांमधील जलस्त्रोतांमध्ये बनावट**
**ब्लिचिंग पावडरचा होत असलेला वापर**

**(६) * २६५५३ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम जिल्हयातील ४२ जलस्त्रोतांमध्ये वापरण्यात आलेले ब्लिचिंग पावडर बनावट असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निष्पन्न झाल्यामुळे संबंधितांवर कारवाई करणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री यांच्याकडे दिनांक ५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) होय,

वाशिम जिल्हयामध्ये वाशिम, मालेगाव, रिसोड, मंगरुळपीर, मानोरा व कारंजा असे एकूण ६ तालुक्यात ६९८ गावे असून ४९३ ग्रामपंचायती आहेत.

जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, वाशिम या प्रयोगशाळेत माहे जानेवारी, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत प्राप्त एकूण ११६४ ब्लिचिंग पावडर नमुन्यांची तपासणी केली असता ५८ नमुन्यांमध्ये उपलब्ध क्लोरीनचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा कमी आढळून आले आहे.

त्याच दरम्यान जिल्ह्यामध्ये एकूण १८५ ब्लिचिंग पावडरचे नमुने जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, वाशिम येथे तपासणीकरीता पाठविले असता १८५ पैकी ९ ब्लिचिंग पावडर नमुन्यामध्ये क्लोरीनचे प्रमाण २० टक्केपेक्षा कमी आढळून आहे आहे.

याबाबत जिल्हा परिषद, वाशिम तर्फे चौकशी करण्यात येऊन त्या अहवालान्वये वाशिम जिल्ह्यातील पंचायत समिती, मानोरा अंतर्गत मौजे ग्राम पंचायत खंबाळा येथे १. गावामध्ये निर्माण झालेला साथरोग नियंत्रणात न ठेवणे २. ग्राम पंचायत कार्यालयात पुरेसा ब्लिचींग पावडरचा साठा न ठेवणे ३. मुख्यालयी न राहणे या बाबत संबंधित ग्राम विकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा यांना दोषी ठरवून त्यांना दिनाक १९.०५.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धामणी (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायत अतंर्गत येणा-या मुसळाचा पाडा येथील पाणी पुरवठा योजनेमध्ये झालेला अपहार**

**(७) * २०५२३ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणी (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायत अतंर्गत येणा-या मुसळाचा पाडा या आदिवासी वस्तीतील पाणी पुरवठा योजना प्रलंबित असून सदर योजनेत लाखो रुपयांचा अपहार झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अभियंता पाणी पुरवठा, शहापूर विभाग यांनी ग्राम पाणी पुरवठा व सल्लागार समिती यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे परवानगी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, सदरची बाब मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचे निदर्शनास आणून त्याची मुख्य कार्यकारी अधिकारीकडे सुनावणी घेण्यात आली आहे.

(३) सदर कामाची उपविभागामार्फत तपासणी करण्यात आली असून तांत्रिक सेवा सल्लागार यांनी झालेल्या कामाचे मुल्यांकन रुपये ७,४८,७६८/- इतके केले आहे. काढलेली रक्कम व मुल्यांकन यात रुपये ३,९२,४६६/- एवढी तफावत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे सदर कामाची सुनावणी घेण्यात आली असता समितीने काम सुरु करण्याचे मान्य करुन पंपघराचे काम केले आहे. विहिरीच्या बांधकामास जागेच्या मालकाने हरकत घेतली असल्यामुळे काम बंद आहे. तसेच योजनेच्या कामात तफावत निदर्शनास आली असल्याने FIR दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगाव जिल्हयातील नियमित वीजबिले भरणा-या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन अनुदान मिळण्याबाबत**

**(८) * २१७१२ श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण):** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची वीजबिले नियमित भरणा-या ग्रामपंचायतींना जिल्हा परिषदेकडून ५० टक्के प्रोत्साहन अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्हयातील ३६६ ग्रामपंचायतींनी प्रस्ताव सादर केल्यानंतर चार वर्षापासून जाहिर झालेले ३३ कोटी २ लक्ष ८ हजार रुपयाचे अनुदान अद्याप शासनाकडून जिल्हा परिषदेस मिळालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगाव जिल्हा परिषदेस उक्त अनुदान न देण्याची कारणे काय, सदर अनुदान तातडीने जिल्हा परिषदेस मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) शासन निर्णय दि. १७/१०/२०१४ अनुसार शासन स्तरावर उपलब्ध असलेल्या देखभाल दुरुस्तीच्या निधीचे वितरण सर्व जिल्हा परिषदांना मंजूर वार्षिक कृती आराखड्याच्या प्रमाणात थेट करण्यात येते. तसेच जिल्हा देखभाल व दुरुस्तीनिधीतील उपलब्ध निधी विचारात घेवून, व त्या अनुषंगाने जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीमध्ये प्राधान्यक्रम ठरवून निधी वाटप जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येते.
(२) व (३) शासनामार्फत निधीच्या उपलब्धतेनुसार गेल्या चार वर्षात ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत देखभाल व दुरुस्ती अनुदान जिल्हा परिषद, जळगाव यांना वितरीत करण्यात आलेले आहे व सामुहिक पाणी पुरवठा/प्रादेशिक पाणी पुरवठा या योजनांवरील नियमित वीज देयके भरण्याची आवश्यकता/तातडीने लक्षात घेवून सदर अनुदान या योजनांवरील नियमित वीज देयकांसाठी खर्च करण्यात आले आहे.

शासन निर्णय दि. १७.१०.२०१४ नुसार जिल्हा परिषदेकडील जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून ग्रामपंचायतीना वीज देयकांची ५० टक्के रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात निकृष्ट दर्जाच्या औषधांचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(९) * १६३३७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :**

सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुजरात, पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तरांचल आणि कर्नाटक येथून निकृष्ट दर्जाची औषधे येत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्य राज्यातून येणारी सुमारे १२.२६ टक्के औषधे निकषाचे उल्लंघन करणारी आहेत असे अन्न व औषध प्रशासनाच्या तज्ज्ञ अधिका-यांकडून सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न व औषधी प्रशासनाने राज्यातील २८१ शासकीय रुग्णालये आणि आरोग्य केंद्रातील विविध औषधांच्या घेतलेल्या चाचण्यात ३३५ औषधे निकृष्ट दर्जाची असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निकृष्ट औषधांमुळे हृदयविकार, रक्ताच्या गुठळ्या होणे, अर्भकातील जन्मदोष, अपंगत्व, मूत्रपिंड आणि स्वादुपिंडास अपाय, उलट्या, मळमळणे, त्वचारोग आदी आजार वाढू लागतात, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर औषधाचे उत्पादन व पुरवठा कोणाकडून करण्यात येतो, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषधे प्रशासनाने बाजारात उपलब्ध औषधांचे नमुने घेऊन चाचणी व विश्लेषण केले असता, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड राज्यातील उत्पादकांचे नमुने अधिक प्रमाणात अप्रमाणित घोषित झाले असल्याचे आढळले.

(२) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनातर्फे माहे एप्रिल, २०१४ ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत इतर राज्यातील उत्पादकांच्या १९७३ नमुन्यांचे विश्लेषण करण्यात आले होते. त्यापैकी २४२ नमुने अप्रमाणित घोषित झाले असून, अप्रमाणित टक्केवारी १२.२६ इतकी होती. तसेच माहे एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत राज्यातील उत्पादकांच्या एकूण ९२३ नमुन्यांचे विश्लेषण केले असून त्यापैकी ३६६ नमुने अप्रमाणित घोषित झाले असून अप्रमाणित टक्केवारी १०.७७ इतकी आहे.

माहे एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत इतर राज्यांचे एकूण ९२३ नमुन्यांचे विश्लेषण केले असून ९१ नमुने अप्रमाणित घोषित झाले आहेत. त्याची टक्केवारी ८.९७ टक्के एवढी आहे.

उपरोक्त टक्केवारी ही चाचणी व विश्लेषणासाठी घेतलेल्या नमुन्यांच्या प्रमाणाची असून ती बाजारांमध्ये उपलब्ध औषधांशी संबंधित नाही.

(३) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०१५ मध्ये अन्न व औषध प्रशासनाद्वारे शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील औषध भांडाराची तपासणी मोहिम राबविण्यात आली होती त्यावेळी एकूण २७० शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील औषध भांडाराची तपासणी करण्यात आली व त्यामधून एकूण ३५२ औषधांचे विश्लेषण केले असता २२ नमुने अप्रमाणित घोषित झाले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) उपरोक्त नमुद औषध अप्रमाणित घोषित झाल्यानंतर प्रत्येक औषधाबाबत उत्पादकाच्या स्तरापर्यंत चौकशी व तपास करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.

१. केंद्र शासनाच्या धोरणानुसार अप्रमाणित अहवालावर उत्पादकांविरुध्द न्यायालयीन कारवाई घेण्याचे आदेश देण्यात येतात.

२. सर्व संबंधित राज्याच्या औषध नियंत्रकास परराज्यातील अप्रमाणित औषधांसदर्भात उत्पादकावर प्रशासकीय कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात येतात.

३. बनावट व अप्रमाणित आढळून आलेल्या औषध नमुन्यांप्रकरणी संबंधितांविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत तरतुदीनुसार संबंधितांविरुध्द प्रशासकीय व न्यायालयीन कारवाई करण्यात येते.

एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ मध्ये इतर राज्यातील उत्पादकांवर ९२ प्रकरणी खटला आदेश देण्यात आले आहेत तसेच एप्रिल ते जून, २०१५ मध्ये इतर राज्यातील उत्पादकावर २२ प्रकरणी खटला आदेश देण्यात आलेले आहेत.

४. राज्यातील विक्रीकरीता उपलब्ध असलेला अप्रमाणित औषधी समुहाचा साठा बाजारातून परत मागे घेण्यात येतो.

-----------------

## राज्यात विद्यापीठामध्ये विविध अभ्यासक्रमाच्या परिक्षांमध्ये राहिलेल्या त्रुटींबाबत

**(१०) * १६४३७ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी),**

**श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड अभ्यासक्रमाच्या परिक्षेत माध्यमिक व मानसशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील दुसरा विभाग छपाई करण्यात आला नसल्याचे तसेच उक्त विद्यापीठातील एम. ए. समाजशास्त्र अधिविभागातील इन्व्हायरमेंट एण्ड सोसायटी इन इंडिया (युथ प्रॅक्टीकल) या विषयाच्या पेपरची प्रश्नपत्रिका नसल्यामुळे पेपर रद्द करण्यात आल्याचे अनुक्रमे दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी तसेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई विद्यापीठाच्या बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (बीएमएस) या परिक्षेत प्रश्नपत्रिकांतील चुका समोर आल्याने विद्यार्थी संभ्रमात पडल्याचे माहे, एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापिठामार्फत कला शाखेच्या व्दितीय वर्षाच्या राज्यशास्त्राच्या पेपरला ८० ऐवजी १०० गुणांची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले तसेच अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठांव्दारे आयोजित बी.एड च्या वेळापत्रकानुसार दि.२३ एप्रिल, २०१५ रोजी असलेला पेपर हा दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी घेण्यात आला असून दुसऱ्या घटनेत सदरील विद्यापीठामध्ये बीएड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना बीएड अभ्यासक्रमाऐवजी दुस-याच विषयाची प्रश्नपत्रिका पुरविली गेल्याने ऐनवळी पेपर रद्द करावा लागल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४)

१. बी.एड अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका संदर्भात विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून व उपलब्ध वेळेचा विचार करुन सदरच्या पेपरचा हस्तलिखित दुसरा विभाग सर्व परीक्षा केंद्राना ई-मेल द्वारे तातडीने पाठविण्यात आला. एम.ए. इन्व्हायरमेंट अँड सोसायटी इन इंडिया या पेपरच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी हा पेपर रविवार दि. १७/०५/२०१५ रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत घेण्यात आला व प्रॅक्टीकल ऐवजी विद्यार्थ्यांकडून स्वाध्याय पूर्ण करुन घेण्यात आला.

उपरोक्त बाबीबाबत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी संबंधिताकडून खुलासा मागविण्यात आला असून खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

२. मुंबई विद्यापीठ :- सदर प्रश्नपत्रिकेतील शंका/त्रुट्या (Querry) निदर्शनास आल्यानंतर त्रुटी असल्याचे जाणवले व त्रुट्यांचे निरसन करुन परिक्षार्थी विद्यार्थ्यांना Querry चे Solution (दुरुस्ती) परीक्षा केंद्रांवर तात्काळ Online (फोनवरुन) पाठविण्यात आली. संबंधितानी केलेल्या हलगर्जीपणाबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा प्राप्त करुन घेण्यात आला आहे खुलासासह ही बाब येत्या परीक्षा मंडळापुढे विचारार्थ ठेवण्यात येणार आहे.

३. सावित्रिबाई फुले, पुणे विद्यापीठ :- परीक्षेचा निकाल जाहीर करताना जेथे ८०/१०० गुणांचे प्रश्नपत्रिकेमुळे अडथळा येणार होता असे निकाल गुणांचे रुपांतर (Conversion) करुन निकाल जाहीर करण्यात आला. विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याबाबत विद्यापीठामार्फत दक्षता घेण्यात आलेली आहे.

४. बी.एड उन्हाळी २०१५ परीक्षेतील Teacher in Emerging Indian Society ही प्रश्नपत्रिका दि. २०/०४/२०१५ ला नियोजीत होती. या प्रश्नपत्रिकेच्या पॉकीटात पुढील दि. २३/०४/२०१५ ला होणारा विषय Education Psychology ही प्रश्नपत्रिका मुद्रीत झालेली परीक्षा केंद्रावर आढळून आली. संपूर्ण ३१ परीक्षा

केंद्रावरील परीक्षा होवू शकली नाही आणि ती परीक्षा पुढे ढकलण्यात आली. या विषयाची परीक्षा दि. ०९/०५/२०१५ ला घेण्यात आली.

सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याकरीता सदर प्रकरण विद्यापीठ कायदा कलम ३२(६) (a) समिती समोर सादर करण्यात येत आहे.

-----------------

## धुतूम (ता.उरण,जि.रायगड) येथील आयओटीएल या रासायनिक आणि तेल साठवणुकीच्या कंपनीतून होणारे वायूप्रदुषण

**(११) * १९८३१ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुतूम ग्रामपंचायतीच्या (ता.उरण,जि.रायगड) हद्दीत असलेल्या आयओटीएल या रासायनिक आणि तेल साठवणुकीच्या कंपनीतून सातत्याने होणारी नाफ्ता चोरी आणि हवेतील रासायनिक वायू प्रदूषणामुळे परिसरातील गावातील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे एप्रिल,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात तेथील ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार करुनही कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर कंपनीवर व त्यांच्या मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) नाफ्ता चोरीबाबत हे अंशतः खरे असून वायू प्रदूषणाबाबत हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गातील निधीचा झालेला अपहार

**(१२) * २५७८५ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यात सन २००६-०७ मध्ये सुरु केलेल्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत (एनआरडीडब्ल्यूपी) सदस्यांच्या निरक्षरतेचा गैरफायदा घेऊन

अधिकारी आणि ठेकेदार यांनी निधीचा अपहार करुन तब्बल १,४७३ नळ पाणी पुरवठा योजनांतून सुमारे २७५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक १३ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही. मात्र १३ जून, २०१५ रोजीच्या सकाळ वृत्तपत्रामध्ये सदर वृत्त प्रसिध्द झाले होते. त्याअनुषंगाने ठाणे व पालघर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागांमार्फत माहिती प्राप्त करुन घेण्यात आली असून अशा प्रकारची बाब नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करंजखेडा (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) केंद्राअंतर्गत गोकुळवाडी येथील नविन शाळाखोली बांधकाम अपूर्ण असल्याबाबत**

**(१३) * २६४७२ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करंजखेडा (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) केंद्राअंतर्गत गोकुळवाडी येथील नविन शाळाखोली बांधकाम चार वर्षानंतरही अपूर्ण अवस्थेत असल्याबाबतचा अहवाल गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांनी शिक्षणाधिकारी यांना दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अहवालात कोणत्या बाबी नमूद केल्या आहेत व या अहवालानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
सदर अहवाल दिनांक १३/०४/२०१५ रोजी सादर केला आहे.
(२) उक्त अहवालामध्ये, "शालेय इमारतीचे, किचनशेडचे व स्वच्छतागृहाचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे, शाळेत शैक्षणिक साहित्य उपलब्ध नाही, शाळेत मोठया प्रमाणात अस्वच्छता असून शैक्षणिक वातावरण दिसून येत नाही, शाळा भेट

रजिस्टरमध्ये एकूण ९ नोंदी आहेत, त्यापैकी ४ भेटीच्या वेळी प्रभारी मुख्याध्यापिका अनधिकृतपणे गैरहजर असल्याची नोंद आहे, शाळेचे आर्थिक अभिलेखे उपलब्ध नसून ते Verification साठी दिल्याचे प्रभारी मुख्याध्यापक यांनी सांगितले" असे नमूद केले आहे.

यासंदर्भात संबंधित मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस दिली असून त्यांनी खुलासा केला आहे. यावर चौकशीसाठी शिक्षणाधिकारी यांनी त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मुंढेकरवाडी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील प्राथमिक शाळेच्या आवारातील पाण्याच्या टाकीची दूरवस्था झाल्याबाबत

**(१४) * २३७८६ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुंढेकरवाडी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील प्राथमिक शाळेच्या आवारातील पाण्याच्या टाकीची दूरावस्था झाली असून कोणत्याही क्षणी सदर टाकी कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय, असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर टाकीची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय

(२) प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर यांचेमार्फत सदर टाकीची पाहणी करण्यात आली आहे. ही टाकी पाडून नवीन टाकीचे बांधकाम करणेबाबत पाहणीअंती सुचविले आहे. जिल्हा परिषद, ल.पा. उपविभाग, श्रीगोंदा कार्यालयाने, जुनी टाकी पाडून नवीन टाकी बांधकाम करण्याकरिता अंदाजपत्रक व प्रस्ताव कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे मंजुरीस्तव सादर केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबत

**(१५) * २२२८० श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बंगाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात तांत्रिक अडचणी असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून अनेक संघटनांनी व पक्षांनी प्रयत्न केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तांत्रिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी मराठी भाषेने अभिजात भाषेचे निकष पूर्ण केले असल्यामुळे सदरील भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतची घोषणा करण्याची परवानगी मिळावी यासाठी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) "मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा" देण्यासंदर्भातील बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील असून याबाबतच्या प्रस्तावाची टिप्पणी संस्कृती मंत्रालयाने केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवालयास सादर केलेली आहे. या प्रकरणी तांत्रिक अडचणीबाबतचा मुद्दा केंद्र शासनाकडून कळविण्यात आलेला नाही.

(२) होय.

(३) मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत तांत्रिक अडचणीबाबत अद्याप केंद्र शासनाकडून काहीही कळविण्यात आले नसल्याने, यासंबंधी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याबाबत शासनाकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती व अकोला एमआयडीसीतील दुषित पाणी अकोला जिल्ह्यातील पुर्णा नदीत सोडल्यामुळे झालेले प्रदूषण

**(१६) * २६२५२ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील पुर्णा नदीत अमरावती व अकोला एमआयडीसीतील दुषित पाणी विना प्रक्रिया सोडून दिल्याने नदीचे पाणी प्रदुषित झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुषित पाण्यामुळे स्थानिक गावांमधील नागरीकांना डायरीया, पोटदुखी, त्वचारोग असे जलजन्य आजार झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुर्णा नदीचे पाणी दुषित असल्याबाबत सक्षम तपासणी यंत्रणेने अहवाल संबंधितांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच नदीचे प्रदुषण रोखण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) औद्योगिक सांडपाण्यामुळे प्रदुषण होते हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) नागरी सांडपाण्यामुळे नदीचे पाणी दुषीत आहे हे खरे आहे.

(४) होय.

(अ) अकोला महानगरपालिका क्षेत्रातील २७ द.ल.ली. एवढे घरगुती सांडपाणी विनाप्रक्रीया प्रतिदिन पुर्णा नदीमध्ये सोडले जात असल्यामुळे म.प्र.नि.मंडळाने दि.०५/०४/२०१३ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले होते.

(ब) तसेच दि.२६/१२/२०१४ च्या आदेशान्वये भांडवली खर्चामधुन २५% तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणेबाबत निर्देश देण्यात आले होते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खोपोली शिळफाटा (ता.खालापूर,जि.रायगड) व उल्हासनगर (जि.ठाणे) येथे अन्न व औषध प्रशासन विभागाने गुटखा जप्त केल्याबाबत**

**(१७) * २०९८१ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली शिळपाटा (ता.खालापूर, जि.रायगड) येथील पटेलनगर भागातील एका गोदाम वजा खोलीतून ७९ हजाराचा गुटखा जप्त केल्याचे दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उल्हासनगर(जि.ठाणे) येथील अन्न व औषध प्रशासन विभागाने व स्थानिक पोलिसांनी सुमारे २ लाख रुपयांचा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग, अलिबाग, जि. रायगड यांनी दि. ७/४/१५ रोजी रशिद मोहम्मद इब्राहिम खान खोपोली (शिळफाटा) पटेलनगर, ता. खालापूर, जि. रायगड हयांच्या रुम मधून प्रतिबंधित अन्न पदार्थांचा एकूण किंमत रु.७८७००/- चा साठा जप्त केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

तथापि, ही घटना दिनांक ०२/०६/२०१५ रोजी घडलेली आहे.

(३) होय.

(४) रायगड येथील प्रकरणी रशिद मोहम्मद इब्राहिम खान यांचे विरुध्द स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग, अलिबाग, जि.रायगड यांनी खोपोली पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र. १०/२०१५ दि.०७/०४/२०१५ रोजी दाखल केला असून, पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेमार्फत सुरु आहे.

उल्हासनगर प्रकरणी मध्यवर्ती पोलिस स्टेशन, उल्हासनगर येथे प्रथम खबरीचा गुन्हा क्र. २६५/२०१५दि. २/६/२०१५ रोजी नोंदविला आहे. सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनातर्फे व पोलिसांमार्फत पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर एम.आय.डी.सी मधील मे. किर्ती गोल्ड व मे. किर्ती सॉलवेक्स लि. या तेल उत्पादक कंपन्यांमधून होणारे प्रदुषण**

**(१८) * २६४१६ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर एम.आय.डी.सी मधील मे. किर्ती गोल्ड व मे.किर्ती सॉलवेक्स लि. या तेल उत्पादन करणाऱ्या कंपन्यांमधून तेलमिश्रित प्रदुषित सांडपाणी कंपन्याबाहेर सोडण्यात येत असल्याबाबत गत ७ वर्षापासून मुख्य कार्यकारी अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, मुंबई उप विभागीय अधिकारी म.प्र.नि. मंडळ लातूर तसेच जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपन्यांमधील इ.टी.पी. प्लान्ट योग्य क्षमतेचे नसल्यामुळे कार्यरत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपविभागीय अधिकारी म.प्र.नि.मंडळ, लातूर यांचेकडे झालेल्या सुनावणीत सदर कंपन्यांनी त्यांना शासन अध्यादेशानुसार लागू केलेल्या अटी व शर्तीचे पालन केलेले नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, लागू असलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करुनही कंपनी व्यवस्थापनाशी संगनमत असल्याने संबंधीत अधिका-यांकडून सदर कंपन्यांवर अद्याप कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने या प्रकरणात दोषी अधिकारी व कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सद्य:स्थितीत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प चालविण्यामध्ये व देखभालीमध्ये व तसेच प्रक्रियायुक्त सांडपाण्याच्या विल्हेवाटीबाबत नजिकच्या काळात त्रुटी आढळून आल्यामुळे सदर उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे सशर्त निर्देश देण्यात आले होते. तथापि, काही शर्तीचे उल्लंघन झाल्यामुळे सदर उद्योगास उत्पादन थांबविण्याचे आदेश दिनांक ८/७/२०१५ रोजी देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील ग्रामीण भाग पूर्णत: निर्मल होण्याबाबत करावयाची कार्यवाही**

**(१९) * २०२०३ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाकडे स्वच्छतागृहे असणे व त्यांचा नियमित वापर करणे यासाठी केंद्र व राज्य पातळीवरुन प्रयत्न सुरु असुन शासनाकडून प्रत्येक वर्षी ५ हजार कुटुंबासाठी स्वच्छतागृहे बांधणे व वापर करण्याचे उद्दिष्ट पंचायत समितींना दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळंब (जि. उस्मानाबाद) तालुक्यात सन २०१२ च्या सर्व्हेक्षणानुसार ९१ ग्रामपंचायती अंतर्गत ३३ हजार ६९९ कुटूंबे असून त्यापैकी फक्त ११ हजार ७५३ कुटूंबांकडे स्वच्छतागृहे असल्याचे व २२ हजार कुटूंबे स्वच्छतागृहापासुन वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित स्थानिक प्रशासनाला शासनाकडून स्वच्छतागृह बांधकाम व वापरात आणण्यासाठी जन जागृती करण्याचे उद्दिष्ट देवूनही संबंधित प्रशासन याकडे गांभीर्याने पाहत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशी अंती सदर तालुक्यातील ग्रामीण भाग १०० टक्के निर्मल होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) राज्याच्या ग्रामीण भागातील उघडयावरील शौचविधी पध्दत बंद करुन राज्य हगणदारीमुक्त करण्यासाठी राज्यात ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमात कालावधीनुसार वेळोवेळी बदल करण्यात आला आहे.

राज्याच्या ग्रामीण क्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या निर्मल भारत अभियानाचे दि.२ ऑक्टोबर, २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) असे केंद्र शासनाद्वारा नामकरण करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे उदिष्ट शौचालय सुविधा नसलेल्या कुटुबांना शौचालय सुविधा उपलब्ध करुन शौचालयाचा नियमित वापर करुन देश तथा राज्य दि.२ ऑक्टोबर,२०१९ पर्यंत हगणदारीमुक्त करणे हे आहे.

यासाठी राज्य, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या स्तरावर नियोजन करुन टप्प्याटप्प्याने ठरविलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) निर्मल भारत अभियानांतर्गत सन २०१२ मध्ये राज्याच्या ग्रामीण भागात स्वच्छतेच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्यात आले. सदर सर्वेक्षणा अंती कळंब तालुक्यातील ९१ ग्रामपंचायतींमधील ८,८२० कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध असल्याचे तर ३०,०४७ कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा नसल्याचे निदर्शनास आले.
(३) व (४) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत वार्षिक कृती आराखडयानुसार उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या अनुषंगाने माहिती, शिक्षण व संवाद यावर भर देऊन लोकांना शौचालय वापरण्याची सवय लागावी यासाठी प्रयत्न केले जातात.

कळंब तालुक्यातील सन २०१५-१६ या वर्षासाठी ३२ ग्रामपंचायतीमध्ये हगणदारीमुक्त गाव निर्मुलन कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांसाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करुन त्यांना उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच कलापथकाद्वारे लोकांमध्ये स्वच्छतेबद्दल जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्याद्वारा सुरु आहेत.

तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) च्या कृती आराखडयातील उद्दिष्टपूर्ती करण्याच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना शासनस्तरावरुन सुचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नीरा देवघर व भाटघर (ता.भोर, जि.पुणे) धरण परिसरातील गावात निर्माण झालेल्या पाणी टंचाईबाबत

**(२०) * १७६६२ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नीरा देवघर व भाटघर (ता.भोर, जि.पुणे) धरण भागातील गावात पाणी टंचाई सुरु झाली असून पंचायत समितीकडे ५ गावे व ११ वाड्यावस्त्यांकरिता टँकर मागणीचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत मात्र यापैकी एकच प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. तरीही एकही टँकर सुरु करण्यात न आल्याने पाण्यासाठी महिलांना वणवण करावी लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त परिसरातील तीव्र पाणी टंचाई लक्षात घेता सदरच्या टँकर प्रस्तावांना मंजूरी देवून त्वरीत टँकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली  वा करण्यात येत आहे,
(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) दिनांक ६.०४.२०१५ ते १६.०४.२०१५ या दरम्यान पंचायत समिती, भोर कार्यालयाकडे नीरा देवघर व भाटघर धरण (ता. भोर, जि.पुणे) परिसरातील ५ गावे व ११ वाडया/ वस्त्यांकरिता टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले होते. एप्रिल, २०१५ अखेरपर्यंत जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडून ५ गावे व ७ वाडया /वस्त्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी टँकरना मंजूरी देण्यात आली.

त्यानुसार ४ टँकर व २ खाजगी पिक अप व्हॅनद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती विभागातील पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(२१) * १८३५९  श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश बुंदिले (दर्यापूर), श्री. दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील माहे मार्च २०१५ पासून ५६ पैकी १६  तालुक्यातील भुजल पातळीत सतत घट झाल्याने भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ४५८ गावांसाठी ५८२ उपाययोजनांच्या कामांचा कृती आराखडा विभागीय आयुक्त, अमरावती यांनी तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, पांढरी ते बोराळा  (ता.अंजनगांव,जि.अमरावती) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणअंतर्गत नविन पाईपलाईनच्या निधीकरिता व दर्यापूर मतदारसंघांतर्गत ग्रामीण भागाकरिता प्रति व्यक्ती ४०लिटर व शहरी भागाकरिता १०० लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, दर्यापूर यांनी दिनांक २५ मे,२०१५ रोजी वा त्यासुमारास मा.पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दर्यापूरसंघातील ७९ गावांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेंतर्गत केलेल्या अनेक कामामध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे व अनेक गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली असून गढूळ पाणी पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कृती आराखड्यातील किती प्रस्तावित उपाययोजनांच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे व कृती आराखडयाला किती खर्च अपेक्षित आहे तसेच सदर प्रस्तावित काम केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने अमरावती विभागात कायमस्वरुपी पाणी पुरवठा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अमरावती विभागातील मागील ५ वर्षाच्या सरासरी भूजल पातळीशी तूलना केली असता अमरावती विभागात एकूण ५६ तालुक्यांपैकी १० तालुक्यात भूजल पातळीत ० ते १ मि.पर्यंत घट आढळून आली आहे.

वितरीत भूस्तर रचना व भौगोलिक परिस्थितीनुसार विभागातील काही जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये टंचाईसदृष्य परिस्थिती निर्माण होऊ शकते. अमरावती विभागातील ३५८६ गावांसाठी, ३६८३ उपाययोजनांचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अमरावती विभागाकरीता सन २०१४-१५ (सन २०१५ चा उन्हाळा) याकरीता एकूण १२०९ उपाययोजनांच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे. ८४३ उपाययोजना पूर्ण झाल्या असून अन्य कामे प्रगतीपथावर आहेत.

प्रस्तावित टंचाई कृती आराखड्यानुसार रुपये ४३८०.९८ लक्ष इतका संभाव्य खर्च अपेक्षित आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जे.जे.रुग्णालयात अनुदानाअभावी औषधे व सर्जिकल साहित्यांची खरेदी न झाल्याबाबत

**(२२) * २५७५४ ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई येथील सर. ज. जी. रुग्णालयात औषध खरेदी व सर्जिकल्सच्या

खरेदी साठी नेहमी अनुदानाची कमतरता भासत असल्याने पुरवठादारांची देयके वेळेवर अदा करताना अडचणी येत असून रुग्णांना लागणाऱ्या अन्नधान्याचे देयक पारीत करण्याकरीता अनुदान अद्याप मिळाले नसल्याचे माहे मार्च २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त रुग्णालयात सर्व राज्यातून व परराज्यांतून दुर्धर आजारावर स्वस्त, परवडणारे व अचूक उपचार करण्यासाठी या रुग्णालयात येणाऱ्या असंख्य रुग्णांना आय. सी. सी. यु. अथवा व्हेंटीलेटर्स मिळण्यासाठी प्रतिक्षायादीवर ठेवण्यात येत असल्याचे माहे मार्च २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित उक्त प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाथर्डी (जि.अहमदनगर) येथे बनावट शिधापत्रिका देण्यात येत असल्याबाबत**

**(२३) * २०८०० श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी (जि.अहमदनगर) येथे नायब तहसिलदार यांच्या सहीने अडीच ते तीन हजार रुपयात बनावट शिधापत्रिका देण्यात येत असल्याचा प्रकार दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) ही बाब खरी नाही.

तथापि, दि. १०.०४.२०१५ रोजी वृत्तपत्रात आलेल्या बातमीनुसार चौकशी केली असता नायब तहसिलदार, पाथर्डी यांच्या बनावट स्वाक्षरीने बनावट रेशन कार्ड खासगी व्यक्तिने तयार केले असल्याचे आढळून आले आहे.

(२) सदरहू प्रकरणी तहसिल कार्यालय, पाथर्डी यांनी गठीत केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार चेअरमन, वि.का.से.सो. पागोरी, पिंपळगांव यांचे विक्रेत्यांवर पाथर्डी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवगड व सावंतवाडी (जि.सिधुदूर्ग) तालुक्यामध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई

**(२४) * १९४८५ श्री.वैभव नाईक (कुडाळ), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ६८ गावे व वाड्यांमध्ये तीव्र पाण्याची टंचाई निर्माण झाली असून दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी टंचाई आराखड्यातून सुचविलेल्या कामांपैकी ९८ कामांना दिनांक ३१ जानेवारी,२०१५ रोजी मंजूरी मिळाली आहे , हे खरे आहे काय,

(२) तसेच देवगड- जामसंडे येथील भौगोलिक परिस्थिती नागरी आणि ग्रामीण क्षेत्र अशा कारणामुळे नळपाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याने खास बाब म्हणून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत सदर नळयोजना मंजूर करण्याच्या मागणीचे एक निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ११ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्र्याची प्रत्यक्ष भेट घेवून दिले, हे ही खरे आहे काय ;

(३) तसेच महाराष्ट्र भुजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ मंजूर केल्यानंतर कणकवली, देवगड, वैभववाडी, कुडाळ, मालवण, सावंतवाडी या तालुक्यातील गावातील खाजगी विहिरींचा व विंधन विहिरींचा आढावा शासनाने घेतला आहे काय,

(४) तसेच, मळेवाड कोंडुरे (ता.सावंतवाडी,जि.सिंधुदुर्ग) या गावासाठी सन २००७ मध्ये रुपये ७५ लाख ६३५ इतक्या रक्कमेची जलस्वराज्य पाणी पुरवठा योजना मंजुर करण्यात आली होती सदरहू योजनेचे निकृष्ट दर्जाचे काम व योजनेतून

लोकांना पाणीच न मिळाल्यामुळे यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधित दोषी विरोधात कारवाई करण्यात यावी अशा मागणीचे एक निवेदन जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग, मा.पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री, मा.ग्रामविकासमंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा आदिकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत व प्रश्न भाग (४) मधील संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

सिंधुदूर्ग जिल्हयाच्या पाणी टंचाई आराखडयास दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांनी मान्यता दिली आहे.

सदर आराखडयात देवगड तालुक्यातील ३ गावे १४९ वाडयांचा समावेश होता. जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांनी मे व जून, २०१५ मध्ये देवगड तालुक्यातील १ गाव व ५१ वाडयांच्या उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. त्यापैकी २४ कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित कामे प्रगतीत आहेत.

(२) होय. हे खरे आहे.

(३) खाजगी विंधन विहीर व विहीरींची माहिती महसूल प्रशासन गाव नमुना १४ मध्ये नोंद घेण्यात येते.

महाराष्ट्र भूजल अधिनियम (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००१ मंजूर करण्यात आला असून नियम तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर नियम अंतिम झाल्यानंतर त्यानुसार भूजल सर्वेक्षण व जिल्हा यंत्रणेमार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) होय. हे खरे आहे.

जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित तक्रारदार यांना दिनांक २१.०८.२०१३ व २४.१२.२०१३ रोजी सदर तक्रारीच्या अनुषंगाने त्यांच्याकडील पुरावे सादर करावे व म्हणणे मांडावे असे कळविण्यात आले होते. तथापि चौकशीसाठी तक्रारदार उपस्थित राहिले नाहीत.

(५) चौकशी अंशत: पूर्ण करण्यात आली.

सन २०१४-१५ च्या पाणी टंचाई आराखडयात ३ गावे ६५९ वाडयांचा समावेश असून त्यापैकी १ गाव २१४ वाडयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

संबंधित तक्रारदार चौकशीसाठी हजर न राहील्याने संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामदा (ता.सावली,जि.चंद्रपूर) ग्रामपंचायतीने निर्मल भारत अभियान कार्यक्रमांतर्गत शौचालयाचे बांधकामात केलेला गैरव्यवहार

**(२५) * १६६६८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामदा (ता.सावली,जि.चंद्रपूर) ग्रामपंचायत येथे निर्मल भारत अभियान कार्यक्रमांतर्गत १८० शौचालयाचे बांधकाम कागदोपत्री पुर्ण झाल्याचे दाखवून सन २०११-२०१२ व २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात रुपये २२००/ व रुपये ३२००/ प्रति लाभार्थी या प्रमाणे रुपये ४ लाख ६२ हजार ६०० इतके अनुदान सरपंच व सचिव यांनी पंचायत समिती, सावली कडून उचल करुन गैरप्रकार केल्याचे मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हापरिषद, चंद्रपूर यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास केलेल्या चौकशीत सिध्द झाले असतांना सुध्दा अद्यापही त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नसल्याची माहिती दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या प्रकरणी चौकशी समितीने केलेल्या चौकशीत फक्त ११ शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित १६९ पैकी १२४ शौचालयाचे बांधकाम २५ टक्के झाले असून ४५ शौचालयाचे बांधकामच करण्यात आलेले नसतांनाही बनावट कागदपत्राच्या आधारे सामदा ग्रामपंचायतीचे सरपंच आणि सचिवांनी १८० शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे दाखवून शासकीय रकमेचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी सरपंच व सचिव यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२),

सदर अनियमिततेबाबत करण्यात आलेल्या चौकशीच्या अहवालानुसार ग्रामपंचायत सामदा (ता.सावली,जि.चंद्रपूर) येथे सन २०११-२०१२ व सन २०१२-१३ या कालावधीत एकूण १८० वैयक्तिक शौचालये प्रत्यक्षात बांधण्यात आली. त्यावर

रुपये ४,६२,६००/- एवढा खर्च झालेला आहे. सदर रक्कम ही लाभार्थ्यांना शौचालयाच्या बांधकामानंतर द्यावयाची प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम आहे. तथापि, सदर रक्कमेपैकी केवळ रुपये १३,२००/- एवढी रक्कम लाभार्थ्यांना वाटप करुन उर्वरित प्रोत्साहनपर अनुदान संबंधित ठेकेदारास प्रदान करण्यात आल्याने या अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाले आहे.
(३) सदर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या दोषींविरुध्द जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश शासनस्तरावरुन देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषत: भंडारा जिल्हयात ब्रँडेड कंपन्यांच्या पाऊचमधून अशुध्द पाण्याची होत असलेली विक्री**

**(२६) * २३३५३ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.राजेश काशीवार (साकोली), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात विशेषत: भंडारा जिल्हयात पाणी पाऊचची मोठ्या प्रमाणात विक्री होत असून ब्रँडेड कंपनीच्या पाऊचमध्ये पाणी अशुध्द असल्याने आरोग्यास घातक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणीपाऊच वर बॅच नंबर, उत्पादन केलेली तारीख व समाप्त तारीखेची नोंद नसल्याने सदर पाणी पाऊचचे नमुने तपासणीसाठी पाठविण्याची नागरिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ब्रँडेड कंपनीने तारखेची नोंद न करण्याची कारणे काय आहेत व सदर मागणीनुसार पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर तसेच कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) भंडारा जिल्हयातील विक्री होणाऱ्या पाणी पाउच मधील पाण्याच्या गुणवत्तेसंदर्भात कोणतीही तक्रार अथवा निवेदन अन्न व औषध प्रशासनाकडे प्राप्त झालेले नाही.

तसेच भंडारा जिल्हयात दि.५/८/२०११ ते ३०/६/२०१५ या कालावधीत पॅकज्ड ड्रिकींग वॉटरचे एकूण ०७ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून, त्यापैकी ०६ नमूने प्रमाणित व ०१ नमुना कमी दर्जाचा घोषित झाल्याने कमी दर्जाच्या नमुन्या संदर्भात प्रकरण न्यायनिर्णयाकरीता दाखल करण्यात आले असून ते न्यायप्रविष्ठ आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खेड व राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गावांच्या**
**पाणी पुरवठा योजनांच्या निधी बाबत**

**(२७) * १८३८४ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खाडीपट्टा भागात येणाऱ्या गावांमधील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी दि. २९ मे, २०१४ रोजी तत्कालिन मा. उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत मुंबई येथे बैठक झाली होती व सदर बैठकीत पाणी प्रश्न सोडविण्यासाठी नव्या पाणी योजना, जुन्या योजनांची दुरुस्ती यासाठी संबंधित गावांना तातडीने प्रस्ताव पाठविण्याचे आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील बहिरवली, संगलट, कोरेगांव, सवणस, दयाळ यांसह परिसरातील ८ गावांतील नळपाणी योजनांच्या दुरुस्तीसाठी शासनाने सुमारे दीड वर्षापूर्वी ४.८७ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्याचा संभाव्य पाणी टंचाई आराखडा तयार केला असून ३८ गावांमधील ७८ वाड्यांचा व ११ धनगर वाड्यांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील निधी उपलब्ध होवूनही नळपाणी योजनांच्या दुरुस्तीची कामे अद्यापही करण्यात आली नसल्याने सदर गावांमधील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने प्रश्न भाग (१) मधील शासनाचा उपलब्ध निधी नळपाणी योजना दुरुस्तीवर खर्ची न करणा-या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता व उपरोक्त पाणी टंचाई दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे. सदर ८ गावांतील नळ पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीकरीता एकूण रुपये ३.०४ कोटी इतका निधी उपलब्ध झालेला आहे.

(३) हे अंशतः खरे आहे. राजापूर (जि.रत्नागिरी) तालुकयात सन २०१४-१५ चा संभाव्य पाणी टंचाई आराखडा अंतीम करुन जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे पत्र क्र. १/१५, दिनांक १९/०१/२०१५ अन्वये मंजूर झालेला आहे. त्यामध्ये राजापूर तालुकयातील १८ गावे ३८ वाड्यांमध्ये ३ धनगरवाड्यांचा समावेश होता.

(४) हे अशंतः खरे आहे. प्रश्न भाग-२ मधील गावांपैकी टंचाई कालावधीत संगलट गावातील ४ वाड्यांमध्ये दिनांक ३१/५/२०१५ ते १७/६/२०१५ या दरम्यान एका टँकरव्दारे व दयाळ गावांतील ४ वाड्यांमध्ये दिनांक १४/०५/२०१५ ते १७/६/२०१५ पर्यंत एका टँकर ने पाणी पुरवठा करण्यात आला आहे. तसेच १२ ग्रामपंचायतीमधील १६ योजनांपैकी ८ योजनांना मंजूरी देण्यात येऊन कामे प्रगतीत आहेत. उर्वरित कामांचे अंदाजपत्रक मंजूरी साठीचे कागदपत्रे घेणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न भाग (१) मधील शासनाचा उपलब्ध निधी नळपाणी योजना दुरुस्तीवर खर्ची न करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तसेच पाणी टंचाई दूर करण्यासाठी खेड व राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्याचा सन २०१४-१५ चा संभाव्य पाणी टंचाई आराखडा अंतीम करुन त्यानुसार खेड तालुक्यातील टँकरग्रस्त २१ गावातील ४० वाड्याकरिता दिनांक १४/०३/२०१५ ते दिनांक ३१/०५/२०१५ या कालावधीत ६ टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला व राजापूर तालुक्यातील टँकरग्रस्त ९ गावांतील २३ वाड्यांकरीता दिनांक १५/०४/२०१५ ते दिनांक १८/०६/२०१५ या कालावधीत २ टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील मौजे देऊळघाट व देऊळगाव कोळ (ता.सिंदखेडराजा) येथील पाणी पुरवठा योजनांबाबत

**(२८) * २१०८७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देऊळघाट (जि.बुलढाणा) येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, देऊळगाव कोळ (ता.सिंदखेडराजा, जि.बुलडाणा) येथील ९९ लाख रुपयांची जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा योजना तिसऱ्यांदा मंजुर करण्यात आल्याची व सदर योजनेच्या कामात गैरव्यवहार होत असल्याची तक्रार तेथील ग्रामस्थ किसन गायकवाड यांनी दि. १७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा. ग्रामविकास मंत्री, ग्रा.वि.सचिव, जि.प. मुख्य कार्य अधिकारी, महाजल योजनेचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१)व(२)बाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने प्रश्न भाग (१) मधील योजना पुर्ण करुन पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत व प्रश्न भाग (२) मधील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

देऊळगाव कोळ, ता.सिंदखेडराजा, जि. बुलडाणा या गावासाठी रु. ८१.७४ लक्ष किंमतीची योजना मंजूर आहे.

ग्रामस्थ श्री.किसन शिवाजी गायकवाड यांनी दि. १५.०४.२०१५ व २५.०४.२०१५ रोजी केलेले तक्रार अर्ज पंचायत समिती सिंदखेडराजा. जि.बुलडाणा यांचेकडे प्राप्त झाले आहेत.

(३) होय.

प्रश्न भाग-१ च्या अनुसार देऊळघाट ५ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे ६० टक्के कामे पूर्ण करण्यात आली असून, सुधारीत प्रशासकीय मान्यतेकरीता पाठविलेला प्रस्ताव विभागात दि. २२.०५.२०१५ रोजी प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

प्रश्न भाग-२ नुसार गटविकास अधिकारी पंचायत समिती सिंदखेड राजा यांच्या मार्फत दिनांक ०९.०५.२०१५ रोजी चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अहवालानुसार सदर चौकशी मान्य नसुन वरीष्ठ स्तरावरुन दुस-या अधिका-यामार्फत फेर चौकशी करण्याबाबत तक्रारदार यांनी दि. १२.०५.२०१५ रोजी लेखी निवेदनाव्दारे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील ६० गावातील नळयोजनांच्या कामांचे प्रस्तावाबाबत**

**(२९) * २६४६१ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागातर्फे नागपूर जिल्हयातील ६० गावातील नळयोजनांच्या कामांचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले होते. मात्र त्यापैकी फक्त मौदा तालुक्यातील हिवरा गांगनेर या एकमेव नळयोजनेला शासनाकडून मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हापरिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या नियोजन शुन्य कारभारामुळे तब्बल ५९ प्रकरणे परत पाठविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगणा तालुक्यातील हळदगाव, चिचोली, सुकळी, कलार, दाभा, उमरीवाघ, देवळी पेंढरी इत्यादी गावातील नळयोजनेचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने चुकीचा प्रस्ताव तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली व हिंगणा तालुक्यातील उपरोक्त गावातील नळयोजना कायान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशतः खरे आहे.

सन २०१२-१३ व २०१३-१४ मधील आराखड्यात समाविष्ट ५९ गावांचे प्रस्तावापैकी हिवरा गांगनेर या नळयोजनेच्या प्रस्तावास दिनांक २७/३/२०१५ अन्वये शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

हिंगणा तालुकयातील एकूण ६ गावांपैकी मौजा हळदगाव योजनेस शासनाने नुकतीच मंजूरी दिली असून, उर्वरित ५ गावांना जिल्हा परिषद स्तरावर मंजूरी देण्यात आली असून, या ५ योजनांमधील पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील चेंबूरनाका येथील एमटीएस या शाळेत व मौजे समगा (ता.जि.हिंगोली) येथील जि.प.प्रा.शाळेत शालेय पोषण आहारात उंदीर व पाल शिजवली गेल्याबाबत

**(३०) * १७४१० श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री. दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूरनाका येथील एमटीएस या शाळेत दुपारच्या वेळेत विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या खिचडीमध्ये उंदराची मेलेली पिल्ले आढळून आल्याचे दिनांक २१ मार्च, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे समगा (ता.जि.हिंगोली) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शालेय पोषणात पाल शिजवली गेल्याने ७० मुलांना विषबाधा झाल्याने जिल्हा रुग्णालयात दाखल केल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग एक व दोन बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसारास संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) दि. ११/४/२०१५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, समगा, ता.जि.हिंगोली या शाळेतील २०३ विद्यार्थ्यांनी शालेय पोषण आहार घेतला होता. त्यापैकी एक विद्यार्थी आहार डब्यातून घरी घेऊन गेला असता आहारामध्ये पाल सदृश्य अंश आढळल्याचे पालकांनी मुख्याध्यापकांना सांगितले. या घटनेची चर्चा झाल्यानंतर १२३ विद्यार्थ्यांना मळमळ व उलटीचा त्रास झाला. सदर विद्यार्थ्यांवर तात्काळ उपचार करण्यात आले आहेत.

(३) व (४) चेंबूरनाका मुंबई पब्लिक स्कूल या शाळेत सदर दिवशी विद्यार्थ्यांना आहार वितरीत करण्यात आलेला नाही. सदर शाळेला आहार पुरविणा-या महिला बचत गटाचे काम बंद करण्यात आले असून बचत गटात रु. ५०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

समगा, ता.जि.हिंगोली येथील आहाराचा नमुना सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे तपासणीसाठी पाठविण्यात आला असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. आहार शिजविणा-या बचत गटाचे काम काढून घेण्यात आलेले आहे.

-----------------

**कोल्हापूर जिल्हयातील बंद पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत**

**(३१) * १८५०२ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कबनुर, चंदुर, कोरोची, तारदाळ, खोतवाडी (जि.कोल्हापूर) या पाच गावांमध्ये वाढीव वसाहती व वाड्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे सदर गावांचा समावेश राष्ट्रीय पेयजल योजनेच्या आराखड्यात करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, इचलकरंजी यांनी मा. पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कबनूर जलस्वराज्य प्रकल्पातून माहे एप्रिल,२०१५ च्या दुस-या आठवड्यात पाणीपुरवठा होत नसल्याने माळ भागातील महिलांनी रास्ता रोको आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील १९ गावातील पेयजल योजना निधीअभावी गत आठ ते नऊ महिन्यापासून बंद असून,आमजाई व्हरवडे (ता.राधानगरी) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील १७ गावे व ८ वाड्यांना माहे एप्रिल, २०१५ पासून पाणी टंचाई निर्माण झाली असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी, चंदगड यांनी पाणी टंचाई दूर करण्याबाबत मा. महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक १५ जून,२०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे , हे ही खरे आहे काय,

(५) तसेच लोटेवाडी (ता.भुदरगड) येथील जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत पाणीपुरवठा योजना ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे तीन वर्षे प्रलंबित असल्याने नागरिकांना पाण्यासाठी पायपीट करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर जिल्हयात उक्त ठिकाणी पाणीपुरवठा करण्याबाबत व प्रलंबित पेयजल योजना सुरु करण्याबाबत तसेच संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) होय.
(३) अंशतः खरे आहे.

आमजाई व्हरवडे नळ पाणी पुरवठा योजनेमध्ये अनियमितता झाल्याने उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.
(४) होय.

आजरा तालुक्यातील सदर गावे व वाड्यांच्या टंचाई आराखड्यात समावेश करण्यात आलेला होता. दरम्यान वळीव स्वरुपाचा पाऊस झाल्यामुळे त्या गावांमध्ये पाणी टंचाई नाही.
(५) नाही.

लोटेवाडी या गावामध्ये झ-यावर आधारित नळ पाणी पुरवठा योजनेतून व बोअरवेलमधून पाणी पुरवठा होत असल्याने पाणी टंचाई नाही. तथापि, नवीन पाणी पुरवठा योजना ही राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत असून योजनेचे काम पुर्ण झाले आहे. परंतू, विद्युत जोडणी न मिळाल्यामुळे योजना सुरु झालेली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील व्यापाऱ्यांना धान भरडाई करिता दिलेले तांदूळ शासनाकडे जमा न केल्याबाबत

**(३२) * २२३६९ श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : तारांकित प्रश्न क्रमांक ८५६० ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयातील व्यापाऱ्यांना शासनाने धान भरडाई करीता दिलेला तांदूळ व्यापाऱ्यांनी भरडाई करून शासनास परत दिला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २३ जानेवारी,२०१५ च्या शासन निर्णयान्वये संबधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेमार्फत करण्यात येणाऱ्या तांदूळ स्वीकृतीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, शासनाने व्यापा-यांकडून थकबाकी घेतली आहे काय तसेच त्यांना दिलेला बारदाना परत केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उक्त तांदूळ जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.
(२) भारतीय अन्न महामंडळाच्या प्रतिनिधींकडून तांदूळाचे सॅम्पलींग करुन शिल्लक तांदूळ ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) ज्या मिलधारकांनी धान भरडाईचे काम पूर्ण केले आहे. त्यांच्याकडील बारदाना परत घेण्यात येत असून बारदाना सुस्थितीत परत न करणाऱ्या मिल धारकांकडून केंद्र शासनाच्या बारदाना घसाऱ्याच्या नियमानुसार रक्कम वसूल करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्ह्यातील भूजल पातळी कमी झाल्याबाबत

**(३३) * १६६२० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे, पालघर जिल्ह्यांतील भूजल पातळी कमालीची खालावत असल्याचे जिल्हा परिषदेच्या भूजल सर्वेक्षण विभागाने अहवालात नमूद केले असल्याचे दिनांक १९ एप्रिल,२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच मोखाडा, डहाणू, तलासरी (जि.पालघर) या अतिदुर्गम आदिवासी पाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याकरिता ओहळ, डबक्यासारख्या दुषित पाण्याचा वापर होत असल्याने अनेक उद्‌भवणारे साथीचे रोग तसेच पाण्याची भीषण टंचाईमुळे पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे दिनांक ६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती भूजल पाण्याच्या पातळीत वाढ होण्याबाबत व पाणी टंचाई निवारणार्थ कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत केलेल्या भूजल पातळीच्या अभ्यासाअंती ठाणे जिल्हयातील ५ तालुक्यात वाढ (० ते १ मीटर) व २ तालुक्यात नगण्य घट (०.०४ मीटर) तसेच पालघर जिल्हयातील ८ तालुकयांपैकी ४ तालुकयांमध्ये भूजल पातळीच्या सरासरी तुलनेत वाढ (० ते १ मीटर) व ४ तालुकयात नगण्य घट (० ते ०.१४ मीटर ) आढळून आलेली आहे.
(२) मोखाडा, डहाणू, तलासरी या अतिदुर्गम आदिवासी पाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याकरीता ओहळ, डबक्यांचा वापर झालेला नाही. तसेच या तिन्ही तालुक्यांमध्ये माहे एप्रिल, २०१५ ते मे, २०१५ या कालावधीत जलजन्य साथीचे रोग उद्‌भवलेले नाहीत.

डहाणू, तलासरी या तालुक्यांमध्ये पाणी टंचाई उद्भवली नाही. मोखाडा या तालुक्यात पाणी टंचाई भासत असल्याने तेथे दिनांक १६/३/२०१५ ते ७/६/२०१५ या कालावधीत टँकरने पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.
(३) भूजल पातळीमध्ये वाढ होण्याकरीता शासनामार्फत खालील कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

अ) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम-पिण्याच्या पाण्याचे उद्‌भव बळकट करण्याकरीता तसेच पिण्याच्या पाण्याची विहीरीची पातळी वाढविण्यास भूजल पुर्नभरणचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

ब) पाणलोट विकास कार्यक्रम-सदर कार्यक्रम मृद संधारण खाते व वंसुधरा/एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन प्रकल्प यांचेमार्फत राबविण्यात येतात.

क) जलयुक्त शिवार अभियान-सदर कार्यक्रमाअंतर्गत भूजल पातळीत वाढ करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात.

त्याचप्रमाणे टंचाई निवारणार्थ मोखाडा तालुक्यात १७ खाजगी टँकरव्दारे ३१ गावे व ४९ पाड्यांना टंचाई कालावधीत पाणी पुरवठा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात निर्माण झालेली पाणी टंचाई

**(३४) * १८१८५ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड**

**उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण होवून टँकरव्दारे पाणीपुरवठा केल्यामुळे शासनावर ४०० कोटीहून अधिक रुपयांचा भार पडला, हे खरे आहे काय,

(२) तसेच पूर्व विदर्भातील १९४२ गावांत चंद्रपुर जिल्ह्यातील एकूण १५ तालुक्यातील १३९१ गावात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे व कन्हान (जि.नागपूर) परिसरात दोन-तीन दिवसांनी पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्यासंदर्भात मुख्याधिकारी यांना एक निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद् नुसार सदर ठिकाणांची पाणीटंचाई निवारणार्थ व राज्य टँकर मुक्त करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

दिनांक ८ जून, २०१५ च्या साप्ताहीक टँकर अहवालानुसार महाराष्ट्र राज्यात एकूण २३२३ गावे ३३३१ वाड्यांमध्ये एकूण २७०८ टँकरव्दारे पाणी पुरवठा सुरु होता.

तथापि यासाठी ४०० कोटींचा भार पडला हे खरे नाही.

राज्यात संभाव्य टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला होता. सदर संभाव्य टंचाई कृती आराखड्यामध्ये रुपये ४४० कोटी रुपयांच्या उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या.

(२) होय, हे खरे आहे.

नागपूर विभागातील पिण्याचे पाणी टंचाई निवारण कार्यक्रम (२०१४-१५) चे अनुषंगाने ऑक्टोबर २०१४ ते जून २०१५ या टंचाई कालावधीसाठी टंचाई निवारक उपाययोजनांचे कृती आराखडे तयार करण्यात आले असून नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गोंदीया आणि गडचिरोली या जिल्ह्यांना मिळून मूळ टंचाई कृती उपाययोजनांसाठी १९४२ गावे व ११ वाड्यात २७२८ उपाययोजनांचा आराखडा तयार करण्यात आला होता. याशिवाय नागपूर, वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांना मिळून पुरवणी टंचाई कृती उपाययोजनांसाठी एकूण १०७४ गावात २२६४ उपाययोजनांचा पुरवणी आराखडा तयार करण्यात आला आहे. मूळ व पुरवणी टंचाई कृती उपाययोजनांसाठी

एकूण ३०१६ गावे व ११ वाड्यात ४९९२ उपाययोजनांचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यासाठी संभाव्य निधी रुपये ४१६२.२४ लक्ष इतका आहे.

कन्हान येथे ज्या भागात पाणी टंचाई जाणवत आहे तेथे ९ टँकरव्दारा पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(३) सर्व जिल्हाधिका-यांनी संबंधित सर्व टंचाईग्रस्त विभागांचा आढावा घेतला असून टंचाई कालावधी ऑक्टोबर, २०१४ ते जून, २०१५ या कालावधीचा टंचाई कृती आराखडा तयार केला आहे. त्यामध्ये एकूण १९४२ गावे, ११ वाड्यांसाठी एकूण २७२८ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

आवश्यकतेनुसार टंचाईअंतर्गत सर्व उपाययोजना घेण्यात येत आहेत.

तसेच, पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर होण्याचे दृष्टीने शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे जलयुक्त शिवार अभियान हा कार्यक्रम या १०७७ गावांत राबविण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील पुरवठा निरिक्षक आणि पुरवठा निरिक्षण अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार

**(३५) * १७९२० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील पुरवठा निरिक्षक राठोड आणि पुरवठा निरिक्षण अधिकारी यांच्या संगनमताने सुरु असलेला गैरव्यवहार निदर्शनास आल्याने जिल्हाधिकारी, पालघर यांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान कारवाई केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच डहाणू (जि.पालघर) तालुक्यात सन १९९८ पासून अनेक विभक्त कुटूंबे शिधापत्रिका नसल्याने अन्न सुरक्षेपासून वंचित असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, व त्यानुसार प्रश्न भाग (१) बाबत संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात व प्रश्न भाग (२) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न भाग (१) च्या अनुषंगाने याप्रकरणी चौकशी करण्यात आली असून, पुरवठा विषयक कामकाज करीत असतांना पुरवठा निरिक्षण अधिकारी व पुरवठा निरिक्षक, वसई यांच्या कामकाजात अनियमितता आढळून आल्याने दोघांना निलंबित करण्यात आले आहे.

प्रश्न भाग (२) बाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रांजणगाव (जि.पुणे) पंचतारांकीत एमआयडीसी मधील कारखान्यांमुळे होणारे प्रदुषण

**(३६) * १९२६५ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणगाव (जि.पुणे) येथील पंचतारांकीत एमआयडीसी मधील अनेक कारखाने वापरलेले पाणी प्रक्रिया न करता एमआयडीसीच्या सीईटीपी प्लॅन्टला सोडतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसी येथील प्रक्रिया न केलेले पाणी खाली ओढे नाल्यांना सोडल्यामुळे ढोकसांगवी, निमगावभोगी, फलकेमळा, सरदवाडी आदी गावांमधील पाण्याचे स्त्रोत दूषित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित ग्रामपंचायतींनी अनेकदा एमआयडीसी, एमपीसीबीकडे तक्रारी करुन ही कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अँण्टॉप हिल (मुंबई) येथील कोकरी आगार येथील शिधावाटप दुकानातील तांदूळ काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना पकडल्याबाबत

**(३७) * २३०७७ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अँण्टॉप हिल (मुंबई) येथील कोकरी आगार येथे असलेल्या प्रकाश किराणा या शिधावाटप दुकानातून २ हजार किलो तांदुळ काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना नागरिकांनी रंगेहाथ पकडल्याचे दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिधावाटप दुकानाचा मालक विनोद गुप्ता यास अटक केली असून अँण्टॉप हिल पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळले, याप्रकरणामध्ये आणखी किती जणांचा सहभाग आहे,

(४)असल्यास, त्यानुषंगाने सदर शिधावाटप दुकानातील मालाचा होत असलेला काळा बाजार रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अॅण्टॉप हिल मांटुगा (मुंबई) कोकरी आगार येथील प्रकाश किराणा स्टोअर्स चे मालक विनोद गुप्ता यांना अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३१ ई १०३ नितीन पटेल यांच्या कडून ६ क्विंटल तांदूळ व अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३१ ई १८४ सुशिलकुमार दुबे यांच्या कडून ७.५ क्विंटल तांदूळ विकल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणात एकूण ३ जणांचा समावेश असल्याचे आढळून आले आहे.

(४) सदर प्रकरणी विनोद गुप्ता यांच्या विरुध्द अॅण्टॉप हिल पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ३६/२०१५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अधिकृत

शिधावाटप दुकान क्र.३१ ई १०३ व अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३१ ई १८४ या दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले असून दोन्ही दुकांनाची चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासन पुरस्कृत माध्यमिक स्तरावरील अपंग समावेशीत शिक्षकांना वेतन न मिळाल्याबाबत

**(३८) * २२९३१ श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन पुरस्कृत माध्यमिक स्तरावरील अपंग समावेशीत शिक्षक योजनेअंतर्गत राज्यातील १ हजार ३६५ विशेष शिक्षकांना ४ वर्षापासून वेतन मिळाले नसल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतन न मिळाल्याने ४ शिक्षकांनी आत्महत्या करुन जीवन संपविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ नुसार शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षकांचे थकित वेतन व आत्महत्याग्रस्त शिक्षकांच्या कुटुंबियांना मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये केंद्र शासनाने वेतन अनुदानासाठी पात्र ठरविलेल्या ३२८ विशेष शिक्षकांचे वेतन अनुदान वितरित करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात निधन झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तीची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्याबाबत

**(३९) * १६३३८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदान प्राप्त शिक्षण संस्थामधील सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यास, त्यांच्या कुटूंबातील एका व्यक्तीस शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार सेवेत सामावून घेण्यास शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यात गेल्या ८ वर्षापासून ४५ प्रकरणे प्रलंबित आहेत तर राज्यातील विविध जिल्ह्यात शेकडो प्रकरणे अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याने शिक्षकांची कुटूंबे निराधार झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार अनुकंपा तत्वावरील भरतीस टाळाटाळ करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच राज्यातील उक्त शिक्षण संस्थेमध्ये अनुकंपा तत्वावरील भरती तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्हयात अनुकंपा कारणास्तव शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची ४० व शिक्षकांची ४ प्रकरणे प्रलंबित आहेत. अनुकंपा नियुक्तीकरिता आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्यात न आल्याने तसेच इच्छूक उमेदवार सज्ञान नसल्याने अशी प्रकरणे सर्व जिल्हयांमध्ये प्रलंबित आहेत.

(३) कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**राज्यात अर्धवेळ व तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या शिक्षकांना वर्षभर वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(४०) * १६४३८ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाकडून संच मान्यतेची प्रक्रिया सुरु झालेली नाही त्यामुळे अर्धवेळ काम करणाऱ्या आणि तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या शिक्षकांना वर्षभर वेतन मिळाले नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिक्षकांना शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी वेतन मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) ऑनलाईन संचमान्यतेची कार्यवाही पूर्ण होताच वेतन अदा करण्यात येईल.

-----------------

**अहमदनगर जिल्ह्यातील प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत**

**(४१) * २४७८४ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत शेवगांव, पाथर्डी, मिरी-तिसगाव, बुऱ्हाणनगर-चांदा, गळनिंब-शिरसगाव या ५ प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना चालविल्या जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनांपैकी शेवगांव, पाथर्डी, मरी-तिसगाव व बुऱ्हाणनगर या नळपाणी पुरवठा योजना चालविणाऱ्या एजन्सीधारकांना मुदत वाढ न दिल्याने तसेच चालविल्यापोटी त्यांची देयके न दिल्याने सदर पाणीपुरवठा योजना दिनांक २१ मे, २०१५ पासून बंद करण्यात आली असल्याने हजारो नागरीकांना पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) मध्ये उल्लेखित ३ प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजना सुरू करण्याबाबत व तेथील ग्रामस्थांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यामध्ये एकूण कार्यरत असलेल्या साखर कारखान्यांमध्ये ई.टी.पी. प्लान्ट उभारण्याबाबत**

**(४२) * २६४१७ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये एकूण कार्यरत असलेल्या साखर कारखान्यांपैकी जवळपास निम्म्या साखर कारखान्यांनी नियमानुसार ई.टी.पी.प्लान्ट उभारलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ई.टी.पी.प्लान्ट न उभारण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर ई.टी.पी.प्लान्ट न उभारणाऱ्या कारखान्यांवर महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) राज्यामध्ये एकूण २०६ साखर कारखाने असून त्यापैकी १७३ कारखाने कार्यरत आहेत. या सर्व कार्यरत कारखान्यांनी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP) उभारलेले आहेत. त्यामुळे हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई वडाळा येथील भारत पेट्रोलियमच्या पाईपलाईन मधून गळती झाल्याबाबत**

**(४३) * २६५७० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई वडाळा येथील भारत पेट्रोलियमच्या पाईपलाईन दिनांक १३ जून, २०१५ रोजी सकाळपासूनच लिकेज सुरु होते. सायंकाळी या लिकेजमधून अचानक पेट घेतल्याने परिसरात भितीचे वातावरण पसरले असल्याची माहिती माहे दिनांक १४ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय.

सदर घटनेची माहिती मिळाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. प्रथमदर्शनी आढळलेल्या प्रत्यक्ष माहितीनुसार पेट्रोलियम उत्पादके वाहून नेणाऱ्या पाईपलाईनची दुरुस्ती करतांना झालेल्या गळतीमुळे ही आग लागल्याचे कळते.

सदर घटनेची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना "कारणे दाखवा" नोटीस बजावलेली असून मंडळाच्या परवानगी शिवाय या पाईपलाईनचा पुन्हा वापर करु नये, असे निर्देश दिले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पवनी (जि.भंडारा) येथील गोसीखुर्द धरणात नागनदीमधील दूषित पाणी सोडले जात असल्याबाबत**

**(४४) * २३३५६ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनी (जि.भंडारा) येथील गोसीखुर्द धरणामध्ये नागनदी मधील (नागपुर )२५६५ एमएलडी दूषित पाणी दररोज सोडले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,त्यामुळे नदीकाठच्या २५ गावांसह पवनी शहरासह अनेक गावातील पाणी दूषित झाल्याने डासांची व जीवजतूंची निर्मिती झाल्यामुळे तेथील नागरिक मलेरिया, डायरिया, डेंग्यू अशा अनेक रोगांच्या प्रादूर्भावाने त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शुध्द पाणी पुरवठा होण्याबाबत व सदर रोगांचा प्रादूर्भाव दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पाणी शुध्दीकरण केल्यानंतर पाणी पूरवठा केला जातो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोताळा, जिल्हा-बुलडाणा यांना पी.पी.पी. कार्यक्रमाअंतर्गत प्राप्त निधी अखर्चित असल्याबाबत**

**(४५) * २५३५३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि. बुलढाणा) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस औद्योगिक व्यवस्थापन समिती मार्फत पी.पी.पी.कार्यक्रमांतर्गत रु.१ कोटी निधी उपलब्ध झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी अद्यापही खर्च न होता तसाच शिल्लक राहिल्याने सदर संस्थेच्या विकासावर पर्यायाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास बाधा निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

पीपीपी योजनेंतर्गत सदर संस्थेस रु. २.५० कोटी निधी केंद्र शासनाकडून बिनव्याजी कर्ज स्वरुपात उपलब्ध झालेले आहेत.

(२) हे खरे नाही.

वर्ष २०१०-११ पासून रु. ३३.७१ लाख खर्च झालेला आहे. सदर संस्थेमध्ये पीपीपी योजनेंतर्गत तारतंत्री आणि कोपा या व्यवसायाच्या तुकडया सुरु केल्या आहेत. तसेच कंत्राटी तत्वावर शिल्प निदेशकाची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेची प्रवेश क्षमता १८८ असून सर्व तुकडयांना डीजीईटी, नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास बाधा निर्माण होत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य व्यवसायात शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयातील सहा. संचालक यांनी अनेक कामे नियमबाह्य केल्याबाबत

**(४६) * १७९२१ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य व्यवसायात शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयातील सहा. संचालक श्री. असावा यांनी अनेक कामे नियमबाह्य केलेली असून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य कर्मचा-यांची छळवणूक करत असल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तसेच तंत्र शिक्षण संचालनालयाकडे दिनांक ११ मे, २०१५ रोजी उच्चस्तरीय व सखोल चौकशी करण्याची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, दि.४ मे, २०१५ च्या पत्रान्वये तक्रार प्राप्त झाली.

(२) व (३) या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत सद्यस्थितीदर्शक माहितीची छाननी व तपासणी करुन नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील शालेय पोषण आहार योजनेसाठी "मध्यवर्ती स्वयंपाकघर योजना" सुरु करण्याबाबत

**(४७) * १९२६८ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय पोषण आहार योजनेसाठी “मध्यवर्ती स्वयंपाकघर योजना” सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून उक्त योजनेसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे तसेच सदरील योजनेत विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा दिल्या जात नाही असा अभिप्राय केंद्रीय शालेय पोषण समितीने दिनांक २९ मार्च, २०१५ रोजी दिला असून या योजनेसाठी निर्माण केलेल्या निरीक्षकांची पदे रिक्त आहेत, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी अशा चांगल्या दर्जाच्या सुविधा पुरविल्या जात नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील शालेय पोषण आहार योजनेमध्ये आरोग्यदायी पॅक्ड फुड देण्यात येईल असे मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी जाहीर केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सदरील शालेय पोषण आहार योजनेमध्ये विद्यार्थ्यांना दूध अथवा दुध पावडर देण्याबाबत व मध्यवर्ती स्वयंपाकघर सुरु करण्यासह विद्यार्थ्यांना सदरील योजनेतून चांगल्या सुविधा देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीसाठी संचालनालय स्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. केंद्र शासनाच्या संयुक्त समीक्षा पथकाने दिनांक २४ ते २८ मार्च, २०१५ या कालावधीत राज्यातील शाळांची पाहणी केली होती. यावेळी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योजनेशी संबंधित रिक्त पदे भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या तसेच, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मदतीने तसेच लोक सहभागातून चांगल्या दर्जाच्या सुविधा देण्याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इ.१ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न देणे बंधनकारक आहे. सदर बाब विचारात घेऊन शालेय पोषण आहार योजनेंतर्गत "रेडी टू कूक" अन्न देण्याच्या अनुषंगाने विचारविनिमय करण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांना आठवड्यातून एकदा दूध देण्याबाबतचा प्रस्ताव या योजनेच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीमध्ये केंद्र शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मंजूरी मिळाली नाही.

केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा अवलंब करुन शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागात तयार आहाराचा पुरवठा करण्याबाबत न्यायालयीन बाब उपस्थित झाल्याने अद्याप सदर प्रणाली लागू झालेली नाही. दि.१७/४/२०१५ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबत शासनाच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. यानुसार शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली सुरु करण्याबाबत पुढील कार्यवाही सरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय व अनुदानित शाळाऐवजी खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याबाबत**

**(४८) * १६३३९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा),**

**श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय व अनुदानित शाळांवर कोटयावधी रुपयांचा खर्च केला जात असतानाही खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने गेल्या दोन वर्षात शासकीय व अनुदानीत शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या ७ टक्क्यांनी घटली आहे तर खाजगी विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या २२ टक्यांनी वाढली असल्याचे कॅगच्या अहवालात माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासकीय शाळांच्या इमारती, पायाभूत सुविधा शिक्षकांच्या रिक्त जागा, त्यांच्या वेतनश्रेणीतील तफावत तसेच शिक्षणाचा दर्जा खालावला असणे इ. च्या कारणामुळे पालक व विद्यार्थी खाजगी शाळांना पसंती देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने शासकीय व अनुदानीत शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, सदर अहवाल प्राथमिक शाळांबाबत आहे.

(२) हे खरे नाही. पालकांचा कल पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये घालण्याकडे आहे. इंग्रजी माध्यमाच्या बहुतांश शाळा या विनाअनुदानित आहेत. यामुळे विनाअनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेशाचे प्रमाण वाढत आहे.

(३) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व खाजगी अनुदानित शाळांमध्ये सेमी इंग्रजी वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व खाजगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार इ. योजनांचा लाभ देण्यात येत आहे. तसेच राज्यात गुणवत्तावाढीसाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व सरल (Systematic Administrative Reforms for Achieving Learning by student- SARAL) इ. उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारी सागरी नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करुन बांधलेल्या बंगल्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४९) * १७९२३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील विशेषत: मांडवा ते श्रीवर्धन (जि.रायगड) समुद्रकिनारी सागरी नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करुन बांधलेल्या सुमारे १७० बंगल्यांवर कारवाई करण्याचे आदेश माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पर्यावरण विभागाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी करण्यात येत असलेली कारवाई अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच रायगड जिल्ह्यातील समुद्र किना-याचे संरक्षण करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय.

रायगड जिल्ह्यात सी.आर.झेड विषयक नियमांचे उल्लंघन करुन बांधण्यात आलेल्या बंगल्याविरुध्द (स्थानिक लोकांचे बंगले वगळून) कारवाई करण्यात येईल असे आश्वासन मार्च,२०१५ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात मंत्री (पर्यावरण) यांनी दिले होते. त्याअनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांना देण्यात आल्या आहेत.

(२) जिल्हाधिकारी, रायगड यांचे अहवालानुसार अलिबाग तालुक्यात १४५, मुरुड तालुक्यात १४१ आणि श्रीवर्धन तालुक्यात १८ अशी एकूण ३०४ बांधकामे सी.आर.झेड अधिसूचना १९९१ लागू झाल्यानंतर केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. यापैकी ३०० अनधिकृत बांधकामधारकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

अलिबाग तालुक्यातील ६३, मुरुड तालुक्यातील ५३ आणि श्रीवर्धन तालुक्यातील ७ अनधिकृत बांधकामांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अलिबाग तालुक्यात ३ व श्रीवर्धन तालुक्यातील १ अनधिकृत बांधकाम यापुर्वी निष्कासित करण्यात आले आहेत.

अलिबाग तालुक्यातील ६०, मुरुड तालुक्यातील ६१ आणि श्रीवर्धन तालुक्यातील १८ प्रकरणांमध्ये सहाय्यक संचालक, नगररचना यांचेकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर प्रकरणांच्या छाननीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल असे जिल्हाधिकारी, रायगड यांचे अहवालात नमुद केले आहे.

(३) रायगड जिल्हयातील समुद्रकिनारी भविष्यामध्ये अनधिकृत बांधकामे निर्माण होणार नाहीत याबाबत संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांना दक्षता घ्यावी व तशा सूचना त्यांना देण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक ०६ जुलै, २०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये राज्यमंत्री (पर्यावरण) यांनी आदेश दिले आहेत.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.